# पाणी कनेक्शन मिळणेबाबत करावयाचा अर्ज

मे. सरपंच/ग्रामसेवक दि.

ग्रामपंचायत बिदाल

ता. माण, जि. सातारा.

अर्जदार :- -----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

यांचा विनंती अर्ज की,

मला वरिल घर नंबरमध्ये ---------इंची व्यासाचे पाणी कनेक्शनची आवश्यकता आहे. पाणी पुरवठयासंबंधीचे प्रचलित नियम व पोटनियम, यात वेळोवेळी जे बदल करणेत येतील. त्याप्रमाणे ते मला मान्य आहेत. पाणी कनेक्शनसंबंधी माहिती खालीलप्रमाणे –

1) ज्या जागेला पाणी पुरवठा करावयाचा त्या ----------------------------------------
जागेचा मिळकत/गट नंबर, रस्ता व वार्ड - ----------------------------------------

2) पाणी पुरवठयावर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने कोणते ----------------------------------------
जागेपर्यंत पाईप लाईन नेणे आहे त्याचे वर्णन - ----------------------------------------

3) पाणी पुरवठा कशाकरिता पाहिजे - ----------------------------------------

4) सर्व्हिस पाईपचा व्यास – ----------------------------------------

5) कनेक्शन कोणामार्फत करून घेणार आहे. ----------------------------------------
प्लंबर मार्फत अगर ग्रा.पं.च्या फिटरमार्फत –

6) ज्या जागेत रोगजंतूचा फैलाव होण्याची शक्यता आहे तेथे सर्व्हिस पाईप अगर त्या पाईपचा फाटा नेणार नाही.

7) सांडपाण्याचा निचरा होणेसाठी ग्रा.पं.च्या हद्दीपर्यंत पक्की गटार बांधून घेतली आहे. कनेक्शन जोडून घेनेपुर्वी बांधून घेत आहे.

8) नियमाप्रमाणे पाणीपट्टीची, डीपाझिटची व कनेक्शन फी, फिटर चार्जेस आगाऊ भरणेस तयार आहे.

9) खुदाई केलेला रस्ता पूर्ववत दुरुस्त करून देणेस तयार आहे. रस्ता खुदाई डीपाझिट भरणेस तयार आहे.

10) सोबत कनेक्शन नकाशा जोडला आहे.

यापैकी अगर कोणत्याही अस्तित्वात असलेला पाणी पुरवठयाचे नियमाचे उल्लंघन केले तर माझा पाणीपुरवठा बंद करावा. मी त्यास हरकत घेणार नाही व होणारे नुकसानीस मी जबाबदार राहीन.

तरी विनंती की, मला वरिल जागेत सत्वर कनेक्शन देणेची व्यवस्था करावी.

मे. कळावे.

तारीख :- अर्जदाराची सही.

# <u>करारपत्र</u> दि.

<u>करारपत्र लिहून देणार :-</u> श्री./सौ/श्रीमती.-----------------------------------------------------

राहणार.------------------------------ ता. माण, जि. सातारा.

कारणे लिहून देतो की, माझे मालकी वहिवाटीची जागा गट/मिळकत नं. या जागेत घरगुती उपयोगासाठी पाणी कनेक्शन मिळावे म्हणून मी ग्रामपंचायतीकडे अर्ज केलेला आहे. त्याबद्दल मी खालीलप्रमाणे करारपत्र लिहून देत आहे.

1) मी सदर जागेत उपयोगासाठी (१ /२ “) अर्धा इंची पाणी कनेक्शनची मागणी केलेली असून नियमानुसार पाणीपट्टीची रक्कम वेळोवेळी भरणा करणेस तयार आहे.

2) मी सदर जागेचा ७/१२, घराचा उतारा जोडलेला आहे व सदर जागा मी वहिवाटीत आहे व या जागेचा वहिवाटदार आहे.

3) या जागेतील इतर कोणाचे अधिकार अगर हक्कदाराची पाणी कनेक्शन व त्याचे पाईपलाईन संबंधी तक्रार आल्यास ती मी दूर करून देईन. तसेच हे पाणी कनेक्शन कोणतीही तक्रार न करता स्वखुषीने बंद करून घेईन अगर ग्रा.पं.ने माझे पाणी कनेक्शन परस्पर बंद केल्याने मी कसलीही तक्रार करणार नाही.

4) गावात होणारा पाणी पुरवठा हा अपुऱ्या स्वरूपाचा असतो हे मला माहिती आहे. पाणी कनेक्शनला अपुऱ्या स्वरूपाचा अगर कमी प्रमाणात पाणीपुरवठा झाला तर कसल्याही प्रकारची हरकत घेणार नाही.

5) या पाणी कनेक्शनच्या सांडपाण्याची विल्हेवाट मी योग्य प्रकारे लावेन. शेजारच्या कोणास त्याचा त्रास होवू देणार नाही, तशी तक्रार असल्यास ती मी स्वखर्चाने दूर करीन. तसे न झाल्यास ग्रा.पं.ने माझे पाणी कनेक्शन बंद केल्यास मी कसल्याही प्रकारची तक्रार करणार नाही.

6) पाणीपुरवठयाच्या नियमांचे, इतर तरतुदीचे वेळोवेळी अंमालत येणाऱ्या नियमांचे उल्लंघन माझेकडून होणार नाही. नियमांचे तंतोतंत पालन करीन.

7) पाणी कनेक्शनचा वापर घरगुती कारणासाठी करीन. बिगर घरगुती कारणांसाठी वापर सुरु केल्यास नियमाप्रमाणे त्याची पाणीपट्टी भरीन. तसेच सदर जागेमध्ये अगर इतर जागेमध्ये

बांधकाम करावयाचे झाल्यास त्याची रीतसर परवानगी काढून नंतरच जी जादा पाणीपट्टी आकारणी होईल ती मी भरणेस तयार आहे. सदरप्रमाणे केले नाही.तर माझे कनेक्शन बंद करण्याचा अधिकार ग्रा.पं.स आहे. मी याकामी कसलीही तक्रार करणार नाही.

8) पाणी कनेक्शनची पाईपलाईन लोखंडी (गल्वहनाईजड) पाईपचा वापर करीन.

9) मी ग्रामपंचायतिची पाण्याची बिले वेळच्यावेळी भरीन. याकामी मी कोणत्याही प्रकारची तोषीस ग्रा.पं.स लागू देणार नाही.

10)मला या ग्रामपंचायतीची मिळकत/गट नं.-------------- मध्ये पाण्याची कनेक्शन मंजूर केले असून या पाणी कनेक्शनमुळे माझे अनधिकृत बांधकाम अधिकृत बांधकामाचे कार्यवाहिबाबत ग्रा.पं.स कोणतीही बाधा येणार नाही. या अटीस अधिन राहून मला नळकनेक्शन मंजूर करावे.

11)हे नळकनेक्शन देणेत आलेमुळे ज्या अनधिकृत वास्तूत हे नळकनेक्शन दिले आहे. त्या वास्तूतची वैधता आपोआप बहाल होत नाही. तसेच ज्या अनधिकृत वास्तूत हे नळकनेक्शन स्थित आहे. आजच्या दिनांकावेळेस अस्तित्वात असल्याबाबत या नळकनेक्शन दिलेमुळे ग्रा.पं.स सदर अवास्तु काढून टाकणेचा हक्क बाधीत होणार नाही. या अटीस अधिन राहून मला नळकनेक्शन द्यावे.

12)मी माझे बांधकामास कंप्लीशन सर्टिफिकेट घेतलेले नाही. तसेच घर वापरण्याची परवानगी घेतलेली नाही त्याबाबत ग्रा.पं. ने काही कारवाही केल्यास त्यास या पाणी कनेक्शनमुळे बाधा येणार नाही. या अटीस अधिन राहून मला नळकनेक्शन द्यावे.

हे करारपत्र माझेवर, इस्टेट वारसावर, मृत्यूपत्र चालविणाऱ्यावर, मुखत्यारावर इत्यादीवर बंधनकारक राहील. म्हणून लिहून दिले करारपत्र .

तारीख:- / /२०

स्थळ:-बिदाल , ता. माण.

स्वाक्षरी
( करारपत्र लिहून देणार)

माझेसमोर,

ग्रामसेवक सरपंच

ग्रामपंचायत बिदाल ग्रामपंचायत बिदाल

ता. माण, जि. सातारा. ता. माण, जि. सातारा.

# <u>हमीपत्र</u>

दि.

<u>हमीपत्र लिहून घेणार :-</u> मा.सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत बिदाल ता. माण,जि. सातारा.

<u>हमीपत्र लिहून देणार:-</u> -------------------------------------------------------------------------------

राहणार ---------------------------------- ता. माण, जि.सातारा.

मी हमीपत्र लिहून देतो की, विजयनगर ग्रामपंचायतीच्या हद्दीत मिळकत/गट नं. -------------------- मध्ये विनापरवाना घर बांधलेले आहे. सदर मिळकत मी गुंठेवारी नियमाधीन कायदयानुसार नियमितीकरण केलेले नाही/बांधकाम परवानगी घेतलेली नाही. हे मला मान्य असून कबुल आहे. यामुळे कायदेशीररीत्या सदर घर बांधकामाबद्दल मला काही हि हक्क अधिकार नाहीत. तथापि मी रहात असलेने सदरच्या घरामध्ये मला पाण्याचे कनेक्शन मिळणे गरजेचे असलेने खालील शर्ती व अटी मला कबूल व मान्य आहेत.

<u>शर्ती व अटी :-</u>

1) मी मागणी केलेली जागा माझ्या मालकीची असून मी या ठिकाणी राहणेसाठी घर बांधलेले आहे.

2) मी ग्रा.पं.ने दिलेल्या पाणी कनेक्शनचा वापर फक्त पिण्यासाठी (घरगुती वापरसाठी ) करीन.

3) पाणी पुरवठया संबंधी ग्रा.पं.चे उपविधी मला लागू असून त्या उपविधीच्या अधिन राहून मी पाणी कनेक्शनचा वापर करीन.

4) ग्रा.पं.प्रचलित पाणीपट्टीच्या दराच्या दिडपट दराने पाणीपट्टी आकारून ती वसूल करणेचा ग्रा.पं.चा अधिकार असेल. प्रचलित दराने दिडपट दराने पाणीपट्टी वेळेवर भरणेस मी तयार असून याबाबत काहीही तक्रार करणार नाही. पाणीपट्टी वेळेवर भरेन.

5) या पाणी कनेक्शनमुळे माझ्या अनधिकृत बांधकामास कोणत्याही प्रकारची वैधता आपोआप बहाल होत नाही.

6) माझ्या अनधिकृत वास्तूत हे पाणी कनेक्शन स्थित आहे. त्यामुळे ग्रा.पं.सदर अनधिकृत वास्तू काढून टाकणेचा हक्क बाधीत होणार नाही.

7) माझे मिळकतीत देण्यात येणार पाणी कनेक्शन हे फक्त मानवतेचा दृष्टीकोन व पाणी हि जीवनावश्यक बाब म्हणून देणेत आलेले आहे. हा कायदेशीर कोणत्याही न्यायालयात पुरावा म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही. तसेच उपयोग करणार नाही. सदरचे पाणी कनेक्शनबाबत शासकीय / ग्रा.पं. धोरणात बदल झाल्यास पाणी कनेक्शन बंद करण्यास माझी काहीही हरकत नाही.

8) ग्रा.पं. ला आवश्यक वाटेल त्यावेळी सदरचे पाणी कनेक्शन विना नोटीस बंद करण्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

9) ज्या मिळकतीस पाणी कनेक्शन मागणी केलेली आहे. त्याच मिळकतीशिवाय पाण्याचा वापर दुसऱ्या कोणासही दिला जाणार नाही. अन्यथा ग्रा.पं.जि कारवाई करेल ती माझेवर बंधनकारक राहील.

10) वरिल सर्व अटी व शर्ती मी स्वखुषीने मान्य करीत असून माझ्यावर व माझ्या वारसावर लागू व बंधनकारक आहे.

वरिलप्रमाणे सर्व शर्ती व अटी मी मान्य करीत असून माझे व माझ्या वारसावर लागू व बंधनकारक आहेत. म्हणून लिहून दिले हमीपत्र.

स्वाक्षरी

( हमीपत्र लिहून देणार )

साक्षीदार :-

1) ------------------------------------------------------------

2) -----------------------------------------------------------------

| | |
|---|---|
| ग्रामसेवक | सरपंच |
| ग्रामपंचायत बिदाल | ग्रामपंचायत बिदाल |
| ता.माण , जि. सातारा. | ता. माण, जि. सातारा. |